महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक,
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता : डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर-४४००२२
Website : www.vanarti.in CIN: U84120MH2026NPL466492 E-mail:vanarti.info@gmail.com

कृपया प्रकाशनार्थ — दिनांक : २३ ऑगस्ट २०२६

# 'वनार्टी'च्या प्रशिक्षणासाठी अर्जांना मुदतवाढ

## यूपीएससी, एमपीएससीसह विविध परीक्षांसाठी २६ ऑगस्ट अंतिम मुदत

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (वनार्टी) मार्फत विमुक्त जाती (व्हिजे-ए) तसेच भटक्या जमाती ब, क व ड (एनटी-बी, एनटी-सी व एनटी-डी) या नॉन-क्रिमीलेअर प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परीक्षांच्या पूर्व प्रशिक्षणाची अर्ज प्रक्रिया सुरू आहे. विद्यार्थ्यांचा राज्यभरातून मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता अर्जाची अंतिम मुदत आता २६ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. 'वनार्टी'कडून केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) राज्यसेवा, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (एमईएस) तसेच संयुक्त गट 'ब' व 'क' या स्पर्धा परीक्षांच्या पूर्व प्रशिक्षणासाठी १० ऑगस्टपासून अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. पूर्वी २३ ऑगस्ट ही अर्ज करण्याची अंतिम मुदत होती. विद्यार्थ्यांकडून मिळालेला प्रचंड प्रतिसाद तसेच संस्थेच्या हेल्पलाईनवरून मुदतवाढीच्या सातत्यपूर्ण मागण्या प्राप्त झाल्याने अर्जाची मुदत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती 'वनार्टी'चे व्यवस्थापकीय संचालक मा. प्रशांत वावगे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

समान धोरणाच्या अनुषंगाने 'वनार्टी'मार्फत राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षांसाठी दर्जेदार पूर्व प्रशिक्षण दिले जाणार आहे. हे प्रशिक्षण अनिवासी व प्रत्यक्ष वर्गपद्धतीने देण्यात येणार असून, प्रशिक्षणात सहभागी विद्यार्थ्यांना दरमहा विद्यावेतन तसेच प्रशिक्षणाच्या प्रारंभी एकरकमी आकस्मिक निधी देण्यात येणार आहे. नामांकित प्रशिक्षण संस्थांमार्फत हे प्रशिक्षण दिले जाणार असून, पात्र विद्यार्थ्यांची निवड प्रवेश परीक्षेद्वारे करण्यात येणार आहे. प्रशिक्षणाची पात्रता, अटी-शर्ती, आवश्यक कागदपत्रे आणि अर्ज प्रक्रियेची सविस्तर माहिती 'वनार्टी'च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. इच्छुक पात्र विद्यार्थ्यांनी मुदत संपण्यापूर्वी अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी 'वनार्टी'च्या संकेतस्थळाला भेट देण्यासह ७८८७८८२०२६ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असेही मा. प्रशांत वावगे यांनी सांगितले.

## मुदतवाढीचा लाभ घेत विद्यार्थ्यांनी अर्ज करावा : अतुल सावे

'वनार्टी'च्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मुदतवाढीचा लाभ घेत आवश्यक कागदपत्रांसह विहित मुदतीत अर्ज करावा, असे आवाहन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री तथा 'वनार्टी'चे अध्यक्ष मा. अतुल सावे यांनी केले. अर्जाची मुदत वाढविण्यात आल्याने अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांना दर्जेदार पूर्व प्रशिक्षणाची संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा प्रभावीपणे उपयोग करून स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी नियोजनबद्ध तयारी करावी, असेही मा. अतुल सावे यांनी सांगितले.

प्रति,
१) मा. संपादक,प्रिंट, ईलेक्ट्रानिक, डिजीटल माध्यम
२) मा.संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
३) मा.जिल्हा माहिती अधिकारी (सर्व जिल्हे)

मा. महोदय,
कृपया उपरोक्त वार्तांकनास आपल्या माध्यमात प्रसिद्धी करावे ही नम्र विनंती.

**डॉ. चेतन बन्सोड**
प्रकल्प अधिकारी
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (वनार्टी),
महाराष्ट्र राज्य

VANARTI

